वीज बचतीची उपाययोजना

**महाराष्ट्र शासन**
**सार्वजनिकबांधकाम विभाग**
**परिपत्रक क्र.संकीर्ण २००५/११४/इमा.३**
दिनांक २३ मार्च २००६

**परिपत्रक**

राज्यामध्ये वीजेच्या मागणीच्या प्रमाणात वीज उत्पादन कमी होत असल्याने वीज टंचाईची परिस्थिती निर्माण झाली आहे. हीच परिस्थिती अजून कांही वर्षे कायम राहण्याची शक्यता असल्याने वीज बचत करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. इमारतींमध्ये वीज बचत करण्याच्या दृष्टीने शासकीय/निमशासकीय कार्यालये, मंडळे, महामंडळे, स्थानिक स्वराज्य संस्था यांच्या कार्यालयामध्ये खालीलप्रमाणे विद्युत उपकरणांचा वापर करण्याच्या सूचना सदर परिपत्रकान्वये देण्यात येत आहेत.

(१) साध्या दिव्यांऐवजी आय.एस.आय.मार्क असलेले कॉम्पॅक्ट फ्लोरोसंट लॅम्प (सी.एफ.एल.) दिव्यांचा व इ+/टी-५ टयूबचा वापर करण्यात यावा.
(२) ज्या ठिकाणी साधे चोक वापरात आहेत, त्या ठिकाणी इलेक्ट्रॉनिक चोकचा वापर करण्यात यावा.
(३) ज्या ठिकाणी पंख्याचे साधे रेग्युलेटर वापरात आहेत, त्या ठिकाणी इलेक्ट्रॉनिक रेग्युलेटरचा वापर करण्यात यावा.

सर्व प्रशासकीय विभागानी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांना या संदर्भात योग्य निदेश द्यावेत. या प्रयोजनासाठी होणारा खर्च उपभोक्ता कार्यालयाने करावयाचा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(डॉ. डी.के.शंकरन)
मुख्य सचिव

प्रत -
मा. मुख्यमंत्री ह्यांचे प्रधान सचिव,
मा. उपमुख्यमंत्री ह्यांचे खाजगी सचिव,
मा.सर्व मंत्री /मा.सर्व राज्यमंत्री हयांचे खाजगी सचिव
मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहाय्यक
सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई.
सचिव (रस्ते), , ह्यांचे स्वीय सहाय्यक,
सचिव (बांधकामे) ह्यांचे जेष्ठ स्वीय सहाय्यक, सार्वजनिक बांधकाम विभाग
सर्व महानगरपालिका, सर्व नगरपालिका, सर्व जिल्हा परिषदा.
कार्यासन इमारती-३ (निवड नस्ती)